पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १५४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## गुरुवार, दि. १३ एप्रिल, २०२३ दुपारी ०४:०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची तातडीची १५४ वी बैठक गुरुवार, दि.१३ एप्रिल, २०२३ रोजी दुपारी ०४:०० वा. नवीन प्रशासकीय भवन येथील सभागृहात मा. कुलगुरु महोदया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरु | अध्यक्षा | उपस्थित |
| २) | डॉ. राजेश दत्तात्रय गादेवार, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. सिद्राम नारायण सलवदे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. डॉ. गौतम सुबण्णा कांबळे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | अनुपस्थित |
| १२) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती रंगरेज आयेशा मोहम्मद सादिक | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १९) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | प्राचार्य डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**अभिनंदन:**

विद्यापीठास ज्यांचे नाव देण्यात आले आहे त्या राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा भव्यदिव्य असा पुतळा विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारतीसमोर उभा करण्याची प्रक्रिया सुरु असतानाच विद्यापीठाच्या भव्य, देखण्या व सुंदर अशा नवीन प्रशासकीय इमारतीतील व्यवस्थापन परिषद सभागृहामध्ये व्यवस्थापन परिषदेची पहिली बैठक आयोजित करण्यात आली असून यापुढे हळूहळू प्रशासकीय कामकाज या इमारतीमधून सुरु होणार आहे, या सर्व कामाचे श्रेय हे विकासाची दुरदृष्टी असलेल्या कर्तबगार व कर्तव्यदक्ष मा. कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस, सर्व सांविधिक अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या अभिनंदनाचा ठराव श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी मांडला. त्यास श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी अनुमोदन दिल्यानंतर बहुसंख्य सदस्यांनी सुध्दा अभिनंदन करुन सदरचा ठराव एकमताने मंजूर केला.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. तसेच नव्याने विद्यापरिषदेतून नामनिर्देशित झालेले डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड व डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरु महोदया यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे यांनी ई-मेलद्वारे अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.१ दि. ०१ मार्च, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

कुलसचिव यांनी दि. ०१ मार्च, २०२३ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव: | दि. ०१ मार्च, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला.<br>तसेच विषय क्र.७(१) च्या अनुषंगाने चर्चेदरम्यान सर्वानुमते असे ठरले की, श्री. शरद शंकर पवार यांना सेवेत रुजू करुन घेतल्यानंतर सेवामुक्त झालेले श्री. रविंद्र महादेव कोरे यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून सद्य:स्थितीत बाह्य स्रोतामार्फत कंत्राटी लेखनिक या पदावर घेण्यात यावे व त्यांचे नियमित पदावर समायोजन करणेबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. |

विषय क्र.२ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (c) नुसार एक अधिष्ठाता व कलम ७० (३) (d) नुसार व्यवस्थापन परिषदेवरील निवडून आलेला सदस्य यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३) (c) व ७० (३) (d) नुसार स्थायी समितीवर खालीलप्रमाणे सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे आहे.

| | |
|---|---|
| कलम ७०(३) (c) | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेला एक अधिष्ठाता |
| कलम ७०(३) (d) | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेला त्या परिषदेचा एक निर्वाचित सदस्य |

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७०(३) (c) नुसार एक अधिष्ठाता व कलम ७० (३) (d) नुसार व्यवस्थापन परिषदेवरील निवडून आलेला सदस्य यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | १. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (c) नुसार, अधिष्ठाता या जागेसाठी प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले व डॉ. सिद्राम नारायण सलवदे यांच्या नावांचे प्रस्ताव आले. तथापि, प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले यांनी माघार घेतल्याने डॉ. सिद्राम नारायण सलवदे, प्र.अधिष्ठाता यांचे सर्वानुमते स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.<br>२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (d) नुसार, निर्वाचित सदस्यांच्या एका जागेसाठी श्रीमती पद्मजादेवी मोहिते-पाटील व श्री. सुधाकर तुकाराम सरवदे यांच्या नावांचे प्रस्ताव आले. एका जागेसाठी दोन सदस्यांची नावे आल्यामुळे प्रस्तावाच्या बाजुने व प्रस्तावाच्या विरुध्द हात वर करुन मतदान घेण्यात आले असता, श्रीमती पद्मजादेवी मोहिते-पाटील यांना बहुमत प्राप्त झाल्याने त्यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यात आले. |

विषय क्र.३ **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (२) नुसार, परिनियम समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (२) नुसार, व्यवस्थापन परिषदेकडून परिनियम गठीत करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार परिनियम समितीवर खालीलप्रमाणे सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे आहे.

| | |
|---|---|
| क) | अध्यक्ष म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या निर्वाचित सदस्यांमधील त्या परिषदेचा एक सदस्य |
| ख) | एक अधिष्ठाता |
| ग) | विद्यापीठ विभागाचा किंवा संलग्न महाविद्यालयांचा एक प्राध्यापक |
| घ) | संलग्न महाविद्यालयाचा एक प्राचार्य |

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (२) नुसार, परिनियम समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | १. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (३) (क) नुसार, एका जागेसाठी डॉ. समाधान दिगंबर पवार व प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार यांच्या नावांचे प्रस्ताव आले. एका जागेसाठी दोन सदस्यांची नावे आल्यामुळे प्रस्तावाच्या बाजुने व प्रस्तावाच्या विरुध्द हात वर करुन मतदान घेण्यात आले असता, डॉ. समाधान दिगंबर पवार यांना बहुमत प्राप्त झाल्याने त्यांचे परिनियम समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.<br>२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (३) (ख) नुसार, एका जागेसाठी प्राचार्य शंकर दत्तात्रय नवले यांचे सर्वानुमते परिनियम समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.<br>३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (३) (ग) नुसार, एका जागेसाठी डॉ. लक्ष्मीकांत दामा व डॉ. नवनाथ लोंढे यांच्या नावांचे प्रस्ताव आले. एका जागेसाठी दोन सदस्यांची नावे आल्यामुळे प्रस्तावाच्या बाजुने व प्रस्तावाच्या विरुध्द हात वर करुन मतदान घेण्यात आले असता, डॉ. नवनाथ लोंढे यांना बहुमत प्राप्त झाल्याने त्यांचे परिनियम समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.<br>३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२ (३) (घ) नुसार, एका जागेसाठी प्राचार्य डॉ. संतोष कोटी व प्राचार्य डॉ. चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या नावांचे प्रस्ताव आले. तथापि, प्राचार्य डॉ. चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या नावाचा प्रस्ताव मागे घेतल्याने प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांचे सर्वानुमते परिनियम समितीवर नामनिर्देशन करण्यात आले. |

**विषय क्र.४ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९८ (२) (घ) व (ङ) नुसार खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेमधून तीन तज्ज्ञ व्यक्तीचे सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९८ (२) (घ) व (ङ) नुसार खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेमधून तीन सदस्यांचे नामनिर्देशन होणे आवश्यक आहे.

त्यास अनुसरुन कलम ९८ (२) (घ) व (ङ) ची तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कलम ९८ (२) (घ) | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले विद्यापीठ विभागांचे व विद्यापीठ परिसंस्थाचे दोन प्रमुख |
| कलम ९८ (२) (ङ) | व्यवस्थापन परिषदेने, त्या परिषदेच्या निर्वाचित सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला त्यापरिषदेचा एक सदस्य |

सबब, उक्त तरतूद विचारात घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९८ (२) (घ) व (ङ) नुसार खरेदी समितीवर व्यवस्थापन परिषदेमधून तीन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

| ठराव: | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९८ (२) (घ) व (ङ) नुसार, खरेदी समितीवर सर्वानुमते खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले. | |
|---|---|---|
| | कलम | नामनिर्देशित केलेल्या सदस्याचे नाव |
| | म. सा. वि. अ. २०१६ कलम ९८ (२) (घ) नुसार, विद्यापीठ विभागांचे व परिसंस्थाचे दोन प्रमुख | १) प्रा. डॉ. विकास बाबुराव पाटील<br>२) डॉ. श्रीमती अंजना संजय लावंड |
| | म. सा. वि. अ. २०१६ कलम ९८ (२) (ङ) नुसार, व्यवस्थापन परिषदेतील निर्वाचित सदस्य | १) श्री. सचिन मारुती गायकवाड |

विषय क्र.५ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४ (२) (च) नुसार वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेमधून दोन तज्ज्ञ व्यक्तींचे सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४ (२) (च) नुसार वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेमधून दोन तज्ज्ञ व्यक्तींचे सदस्य म्हणून नामनिर्देशन होणे आवश्यक आहे.

त्यास अनुसरुन कलम ९४ (२) (च) ची तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कलम ९४ (२) (च) | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले दोन तज्ज्ञ, त्यापैकी एक व्यक्ती ही लेखांकन आणि लेखापरीक्षा क्षेत्रातील तज्ज्ञ असेल दुसरी व्यक्ती ही वित्त क्षेत्रातील तज्ज्ञ असेल. |

सबब, उक्त तरतूद विचारात घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४ (२) (च) नुसार वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेमधून दोन तज्ज्ञ व्यक्तींचे सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | १. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९८ (२) (च) नुसार, लेखांकन आणि लेखापरीक्षा क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून सीए धनराज नोगजा यांचे सर्वानुमते वित्त व लेखा समितीवर नामनिर्देशन करण्यात आले.<br>२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९८ (२) (च) नुसार, वित्त क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून प्रा. डॉ. गौतम कांबळे व डॉ. श्रीमती किर्ती पांडे यांच्या नावांचे प्रस्ताव आले. तथापि, प्रा. डॉ. गौतम कांबळे यांनी माघार घेतल्याने डॉ. श्रीमती किर्ती पांडे यांचे सर्वानुमते वित्त व लेखा समितीवर नामनिर्देशन करण्यात आले. |

**विषय क्र.६ व्यवस्थापन परिषदेने जिल्ह्यासाठी सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रमाचे जिल्हा समन्वयक म्हणून नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: महाविद्यालय परिसंस्था व विद्यापीठ विभाग यांच्यामधील विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी व त्यांचे अवेक्षण करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ५५(१) अन्वये विद्यार्थी विकास मंडळ स्थापन करण्यात आले आहे. तरी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ५५(२)(छ) अन्वये जिल्ह्यासाठी सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रमाचे जिल्हा समन्वयक म्हणून नामनिर्देशन करावे लागणार आहे. त्यानुसार विद्यार्थी कल्याण कार्यक्रमाचे जिल्हा समन्वयक म्हणून नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **व्यवस्थापन परिषदेने जिल्ह्यासाठी सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रमाचे जिल्हा समन्वयक म्हणून डॉ. संतोष कदम यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** |

विषय क्र.७ **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या सुरु करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांवर दिनांक १३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव शासनास सादर करणेसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ व उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या दिनांक १३/०९/२०१७ च्या शासन निर्णयात नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया सुरु करण्यासाठी विविध संस्थाकडून दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी प्रस्ताव मागविण्यात यावे अशी तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (४) (ग) अन्वये "विहित केलेल्या कालमर्यादेच्या आत प्राप्त झालेल्या अशा सर्व अर्जांची अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते, व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने त्या वर्षाच्या १ एप्रील रोजी किंवा त्यापूर्वी, व्यवस्थापन परिषदेस योग्य वाटतील अशा संबध्द कारणांनी यथोचित पुष्टी दिलेल्या शिफारशीसह राज्य शासनाकडे पाठविण्यात येतील." अशी तरतूद आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया सुरु करणेबाबत २१ प्रस्ताव प्राप्त झालेले असून त्याची दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार छाननी समितीची व तज्ज्ञ समितीची (Spot Visit) कार्यवाही पूर्ण झालेली आहे. तद्नंतर अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करावयाची कार्यवाही व सदरच्या कार्यवाहीस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि, दिनांक १३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १.१६ मधील तरतूदीनुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (४) (ग) मधील तरतूदीनूसार सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी ०१ एप्रिल २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी शासनास सादर करावेत असे आदेशित केलेले आहे. अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यासाठी व सदरच्या कार्यवाहीस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. यास्तव वेळेअभावी तातडीची बाब असल्याने अधिष्ठाता मंडळाच्या व व्यवस्थापन परिषदेच्यावतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा.कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात प्राप्त पात्र २१ प्रस्ताव शासनास सादर करण्यास दि.१७/०३/२०२३ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या सुरु करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांवर दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव शासनास सादर करणे संदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा.कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या सुरु करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांवर दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव शासनास सादर करणेसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा. कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.८ शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक व व्यावसायिक (A.I.C.T.E. अंतर्गत) अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्ताराचे प्राप्त प्रस्तावांवर विहित कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल पूर्वी शासनास सादर करणे आवश्यक आहे. तथापि, वेळेअभावी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी संलग्नित महाविद्यालयांकडून सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे पारंपारिक व व्यावसायीक (A.I.C.T.E. अंतर्गत) अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त प्राप्त प्रस्तावांवर विहित कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करावयाची कार्यवाही व सदरच्या कार्यवाहीस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. दरवर्षीप्रमाणे नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रमाणे करावयाच्या कार्यपध्दतीनुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९(४)(ग) मधील तरतूदीनूसार सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी ०१ एप्रिल २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी शासनास सादर करावेत, असे आदेशित केलेले आहे. या आधारे अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यासाठी व सदरच्या कार्यवाहीस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. यास्तव वेळेअभावी तातडीची बाब असल्याने व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरु यांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात प्रस्ताव शासनास सादर करण्यास दि. २३/०३/२०२३ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेले आहेत.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक व व्यावसायीक (A.I.C.T.E. अंतर्गत) अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्ताराचे प्राप्त प्रस्तावांवर विहित कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल पूर्वी शासनास सादर करणे आवश्यक आहे. तथापि, वेळेअभावी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक व व्यावसायिक (A.I.C.T.E. अंतर्गत) अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्ताराचे प्राप्त प्रस्तावांवर विहित कार्यवाही करुन पात्र प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल पूर्वी शासनास सादर करणे आवश्यक आहे. तथापि, वेळेअभावी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र.९ दि.१०/०४/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**

टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.१०/०४/२०२३ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

विद्यापीठ परिनियम S. ३३९ (f) नुसार दि.१०/०४/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, दि.१०/०४/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ)

| | |
|---|---|
| ठराव: | **दि.१०/०४/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

| विषय क्र.१० | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४७ (३) (घ) (ङ) व (च) नुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळावर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.** |
|---|---|

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४७ (३) (घ) (ङ) व (च) नुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळावर सदस्यांचे नामनिर्देशन होणे आवश्यक आहे.

त्यास अनुसरुन कलम ४७ (३) (घ) (ङ) व (च) ची तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कलम ४७ (३) (घ) | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले, अधिष्ठात्याव्यतिरिक्त दोन प्राचार्य |
| कलम ४७ (३) (ङ) | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा विद्यापीठ विभागामधील एक प्राध्यापक |
| कलम ४७ (३) (च) | व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा किमान १५ वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेला विभागप्रमुख किंवा प्राचार्य यांच्याखेरीज संलग्न महाविद्यालयांमधील एक अध्यापक |

सबब, उक्त तरतूद विचारात घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४७ (३) (घ) (ङ) व (च) नुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळावर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४७ (३) (घ), (ङ) व (च) नुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळावर सर्वानुमते खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले.**

| कलम | नामनिर्देशित केलेल्या सदस्याचे नाव |
|---|---|
| म. सा. वि. अ. २०१६ कलम ४७ (३) (घ) नुसार, दोन प्राचार्य | १) प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर<br>२) प्राचार्य डॉ. शशिकांत तांबे |
| म. सा. वि. अ. २०१६ कलम ४७ (३) (ङ) नुसार, विद्यापीठ विभागामधील एक प्राध्यापक | १) प्रा. डॉ. विकास घुटे |
| म. सा. वि. अ. २०१६ कलम ४७ (३) (च) नुसार, संलग्न महाविद्यालयांमधील एक शिक्षक | १) डॉ. संतोष राजगुरु |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| | |
|---|---|
| **विषय क्र. ११(१)** | **अभियांत्रिकी विभागाचे प्रशासकीय व परीक्षा भवन बांधकामापोटी अग्रीम रक्कम ₹२.९७ कोटी व खेलो इंडिया योजनेअंतर्गत बांधकामासाठी ₹९५ लक्ष असे एकूण ₹३.९२ कोटी इतके अदा करण्याकरिता मुदतठेवीवर ओव्हरड्राफ्ट घेण्याची बाब विचारार्थ.** |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात विद्यापीठाची प्रशासकीय इमारत व परीक्षा भवनाचे तसेच खेलो इंडिया योजनेतंर्गत इनडोअर मल्टीपर्पज हॉलचे बांधकाम सुरु आहे. प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन या बांधकामाबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात ₹५५ कोटी इतकी तरतूद केलेली आहे. यासंदर्भात निधी मिळण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे. निधीचा पहिला हप्ता जुलै २०२३ अखेर प्राप्त होण्याची शक्यता आहे तसेच खेलो इंडिया योजनेतंर्गत पुढील हप्ता ₹२.२५ कोटी लवकरच विद्यापीठास प्राप्त होण्याची शक्यता आहे.

सदर बांधकामाचे देयक संबंधित मक्तेदारांना अदा करण्यासाठी अभियांत्रिकी विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. प्रस्तावानुसार प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारत बांधकामापोटी अग्रीम ₹२.९७ कोटी व खेलो इंडिया योजनेतंर्गत इनडोअर मल्टीपर्पज हॉलच्या बांधकामापोटी अग्रीम ₹९५ लक्ष असे एकूण ₹३.९२ कोटी अदा करावे लागणार आहेत. उपरोक्त देयकाच्या आदायगीकरिता निधीची व्यवस्था करण्याबाबत अभियांत्रिकी विभागाने वेळेत कोणतीही पूर्वसूचना दिलेली नाही. सद्य:स्थितीत उपलब्ध अपुरा निधी व देयक अदायगीची तातडी विचारात घेता, विद्यापीठाकडे असलेल्या मुदतठेवीवर ओव्हरड्राफ्ट घ्यावा लागणार आहे. याबाबत समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६७ मध्ये तरतूद उपलब्ध आहे. तसेच वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचा दि.२७/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील अ.क्र. (ड)( g) मध्ये ठेवीवर ओव्हरड्राफ्ट / कर्ज / कॅश क्रेडिट घ्यावयाचे असेल तर संचालक मंडळाची मान्यता घ्यावी असे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत विद्यापीठाच्या विकास निधी अंतर्गत विविध राष्ट्रीयीकृत बँकेत निधीची गुंतवणूक करण्यात आलेली आहे. सदर निधीच्या मुदतठेवीवर ओव्हरड्राफ्ट घेतल्यास १% जादा व्याजदर, उचललेल्या रकमेवर परतफेड करण्याच्या कालावधीपर्यंत बँकेकडून आकारण्यात येणार आहे.

सबब, उपरोक्त देयक अदायगीची तातडी व उपलब्ध अपुरा निधी विचारात घेता, अभियांत्रिकी विभागाचे प्रशासकीय व परीक्षा भवन बांधकामापोटी अग्रीम रक्कम ₹२.९७ कोटी व खेलो इंडिया योजनेअंतर्गत बांधकामासाठी ₹९५ लक्ष असे एकूण ₹३.९२ कोटी इतके अदा करण्याकरिता विकास निधीच्या मुदतठेवीवर ओव्हरड्राफ्ट घेण्यास व परतफेडीपर्यंतचे त्यावर बँकेकडून आकारण्यात येणारे प्रत्यक्ष व्याज अदा करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **अभियांत्रिकी विभागाचे प्रशासकीय व परीक्षा भवन येथील कामाचे देयक ₹२.९७ कोटी तसेच खेलो इंडिया योजनेअंतर्गत बांधकामाचे देयक ₹९५ लक्ष असे एकूण देयक ₹३.९२ कोटी अदा करण्यासाठी विद्यापीठ खात्यात अपुरा निधी असल्यामुळे विद्यापीठ विकास निधीच्या मुदत ठेवीवर ₹४.० कोटींचा ओव्हरड्राफ्ट घेण्यास व परतफेडीपर्यंत प्रत्यक्ष व्याज बँकेस अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

डॉ. सुशिल कुमार शिंदे आणि श्री. सचिन गायकवाड यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

विषय क्र. ११(२) प्रस्तुत विद्यापीठ संकुलातील तासिका/कंत्राटी तत्वावरील शिक्षकांना दरमहा वेतन/मानधन तसेच प्रशासकीय विभागात बाह्य स्त्रोतामार्फत कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचारी यांचे प्रतिदिन वेतन वाढविण्याची बाब विचारार्थ.

ठराव: प्रस्तुत विद्यापीठाच्या संकुलामध्ये कार्यरत असलेले तासिका/कंत्राटी तत्वावरील शिक्षकांना खालीलप्रमाणे वेतनवाढ करण्यास व सदरची वाढ ही शैक्षणिक वर्ष २०२३-२४ जेव्हा सुरु होईल तेव्हापासून लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच, ज्या विभागांमध्ये विद्यार्थी संख्या ५ किंवा त्यापेक्षाही कमी आहे अथवा प्रवेश नाहीत अशा विभागांमधील शिक्षकांना सदर पगारवाढ लागू राहणार नाही.

| अ. क्र. | तपशिल | सध्याचे एकत्रित वेतन | सुधारित एकत्रित वेतन |
|---|---|---|---|
| १. | NET/SET/GPAT/Ph.D. ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे | ₹२२,०००/- | ₹३०,०००/- |
| २. | NET/SET/GPAT/Ph.D. ही शैक्षणिक अर्हता न धारण करणारे | ₹१८,०००/- | ₹२५,०००/- |

तसेच विद्यापीठातील प्रशासकीय विभागांमध्ये बाह्य स्त्रोतामार्फत कार्यरत असलेल्या एकत्रित वेतनावर कार्यरत कंत्राटी कर्मचारी वगळता कुशल, अर्धकुशल व अकुशल या प्रकारांमध्ये कार्यरत असलेल्या इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन अधिनियम, १९४८ नुसार वेळोवेळी देय असलेल्या प्रतीदिन वेतनामध्ये ₹१००/- इतकी प्रतीदिन वाढ करण्यास व सदरची वाढ ही माहे मे, २०२३ पासून लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

त्याचप्रमाणे वेळीवेळी शासनाकडून किमान वेतन अधिनियम, १९४८ नुसार प्रतीदिन वेतनामध्ये वाढ करण्यात येईल त्यावेळी सदरची प्रतीदिन ₹१००/- वाढ लागू राहील.

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद